<u>**यशोगाथा**</u>



**लाभार्थाचे नाव**:- श्री. यशवंत तुळशीराम ठाकरे
मु. पो. पाथरी, ता. सावली, जि. चंद्रपूर
वय:- 52 वर्षे, शिक्षण:- नाही, शेती :- नाही

मी मौजे – पाथरी ता. सावली जि. चंद्रपूर येथील रहीवासी आहे.मी ढिवर समाजाचा असनु माझा मुख्य व्यवसाय मासेमारी आहे. टसर कोष उत्पादनाचे कामकाज वडीलोपार्जित असून मी जवळपास 35-40 वर्षापासून करीत आहे. पाथरी येथील कार्यालय स्थापने नंतर नवनवीत तांत्रिक मार्गदर्शनामुळे सद्यास्थितीत आमच्या कोष उत्पादनात चांगल्या प्रकारे वाढ झालेली असुन कोषा पासून चांगले आर्थिक लाभ मिळत आहेत. मला दोन मुली व एक मुलगा आहे. कोष उत्पादनाच्या व्यवसायामध्ये मला माझ्या संपुर्ण कुटुंबाचा हातभार व मदत मिळत आहे. मला कोष उत्पादनापासुन मिळालेल्या आर्थीक लाभातुन मी माझ्या दोन मुलीचे व एका मुलाचे चांगल्या प्रकारे लग्न समारंभ पार पाडु शकलो. तसेच पाथरी कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी रानामध्ये येवुन वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन करीत असल्यामुळे मला चांगल्या प्रकारे कोषाचे उत्पादन होवुन आर्थीक लाभ मिळालेला आहे. माझा तिन वर्षाचा कोष उत्पादनाचा अहवाल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | घेतलेले अंडीपुंज | झालेले कोष उत्पादन | कोषा पासुन मिळालेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 2016-17 | 1100 | 41300 | 63000/- |
| 2 | 2017-18 | 1300 | 38300 | 60500/- |
| 3 | 2018-19 | 750 | 33500 | 55000/- |

मला चंद्रपूर जिल्हयात जास्त उत्पादन घेणारा शेतकरी म्हणुन दि. 1 सप्टेंबर, 2018 रोजी नागपुर येथे रेशीम सत्कार करण्यात आलेला आहे. तसेच माननिय नामदार श्री. अर्जुन खोतकर साहेब, मंत्री, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचे कडुन रेशीम दिना निमित्य उत्कृष्ठ शेतकरी म्हणुन जालना येथे सन्मानित करण्यात आले आहे.

आपला लाभार्थी

श्री. यशवंत तुळशीराम ठाकरे